# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका, परिवहन विभागातर्फे महानगरपालिका
**{परिवहन विभाग}** अधिनियमांतर्गत कलम ९७ व ९८ अन्वये परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प "ब" तयार करण्याचे तरतुदीनुसार सन २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२३-२४ चे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सन २०२३-२४ चे प्रस्तावित अर्थसंकल्प "ब" यास मा. प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांचेव्दारे मान्यता प्राप्त करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 297/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 01/03/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापन, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, परिवहन विभागातर्फे महानगरपालिका अधिनियमांतर्गत कलम ९७ व ९८ अन्वये परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प "ब" तयार करण्याचे तरतुदीनुसार सन २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२३-२४ चे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सन २०२३-२४ चे प्रस्तावित अर्थसंकल्प "ब" यास मा. प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांचेव्दारे मान्यता प्राप्त करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**